Anekant Education Society's

# Tuljaram Chaturchand College, Baramati

TULJARAM CHATURCHAND COLLEGE BARAMATI

# Notice

Displayed on :03/08/2022 Notice No. : 222

- 4 AUG 2022

## केंद्र शासनाची कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालयातील दिव्यांगजन विद्यार्थ्यांसाठी पोस्ट मॅट्रीक शिष्यवृत्ती योजना शैक्षणिक वर्ष २०२२—२३:—

केंद्र शासनाच्या सामाजिक न्याय व अधिकारीता मंत्रालय, नवी दिल्ली यांचे मार्फत दिव्यांगजन विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी आर्थिक सहाय्य करणे या उद्देशाने पोस्ट मॅट्रीक शिष्यवृत्ती योजना राबविण्यात येते. शैक्षणिक वर्ष २०२२—२३ साठी नंविन व नूतनीकरणासाठी ऑनलाईन पध्द्तीने अर्ज मागविण्यात येत आहेत. तरी, विद्यार्थ्यांनी दिलेल्या नियम व अटींच्या आधीन राहून www. scholarships.gov.in या संकेतस्थळावर दि. ३१/१०/२०२२ पर्यंत ऑनलाईन अर्ज करावेत.

## किमान पात्रता व अटी :—

१. अर्जदाराची अपंगत्व टक्केवारी ४० टक्के व त्यापुढील असावी.
२. अर्जदार मागील वार्षिक परीक्षेत उत्तीर्ण झालेला असावा.
३. अर्जदार इतर कोणत्याही शिष्यवृत्ती योजनेचा / स्टायपेंड लाभार्थी नसावा.
४. अर्जदाराच्या पालकांचे एकत्रित वार्षिक उत्पन्न मर्यादा रु.२.५० लाख इतकी असावी.

## अर्जासोबत आवश्यक कागदपत्रे :—

१. विद्यार्थ्याचा फोटो व मागील वर्षाची गुणपत्रिकेची प्रत.
२. पालकांचा सन २०२१—२२ चे मा. तहसिलदार यांनी प्रमाणित केलेला वार्षिक उत्पन्नाचा दाखला जोडणे आवश्यक आहे.
३. महाविद्यालयाची चालू वर्षाची फी भरल्याची पावती /रिसीट.
४. स्वत:च्या राष्ट्रीयकृत बॅंक खाते पासबुकच्या प्रथम पानाची छायांकित प्रत.

D:\users\amsolankar\Scholarship 2022-2023\Scholarship Notice 2021-22\Handicapped Scholarship 2020-21.docx

५. विद्यार्थ्यांचे अपंग असल्याबाबतचे प्रमाणपत्र राज्य शासनाच्या सक्षम वैद्यकिय अधिका-याने प्रमाणित केलेले असणे आवश्यक आहे.

६. आधारकार्ड छायांकित प्रत. तथापि एखाद्या विद्यार्थ्याकडे आधारकार्ड नसेल तर त्या विद्यार्थ्याने नोंदणी आयडी स्लीप किंवा बँक खाते पासबुकच्या प्रथम पानाची फोटोसह असलेली छायांकित प्रत किंवा पॅनकार्ड अथवा ड्रायव्हिंग लायसन्सची प्रत इ. यापैकी एका कागदपत्राची छायांकित प्रत जोडावी.

७. आधार क्रमांक बँक खात्याशी लिंक केलेला असणे आवश्यक आहे. विद्यार्थ्यांचे बँक खाते स्वत:च्या नावावर असावे ते जॉईंट खाते नसावे.

<u>नविन मंजुरी आणि नूतनीकरणासाठी ऑनलाईन अर्ज करण्याची कार्यपध्दती:-</u>

१. दिव्यांगजन विद्यार्थ्यांसाठी पोस्ट मॅट्रीक योजनांच्या मार्गदर्शक तत्वानुसार पात्र व इच्छुक विद्यार्थ्यांनी नवीन मंजूरीसाठी व नूतनीकरणासाठी **www.scholarships.gov.in**या संकेतस्तळावर ऑनलाईन पध्दतीने अर्ज भरणे आवश्यक आहे.

२. विद्यार्थ्यांनी ऑनलाईन अर्ज करण्याची अंतिम मुदत दि. ३१/१०/२०२२ ही आहे .

३. ज्या विद्यार्थ्यांकडे आधार क्रमांक आहे अशा विद्यार्थ्यांनी आधार क्रमांक या पर्यायाचा वापर करुन अर्ज भरावा. आधार क्रमांक नसेल तर त्याऐवजी आधार नोंदणी आय.डी. स्लीप किंवा बँक खाते पासबुकच्या प्रथम पानाची फोटोसह असलेली छायांकित प्रत अपलोड करुन अर्ज भरावा.

४. विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीचे लाभ मिळणेसाठी आधार क्रमांक त्यांच्या बँक खात्याशी संलग्न **(Link)** असने आवश्यक आहे. त्यामुळे लाभार्थी विद्यार्थ्यास शिष्यवृत्ती रक्कम सुरळितपणे जमा होण्यास मदत होईल.

५. बँक खाते क्रमांक व इतर बँक तपशील भरण्यास विद्यार्थ्यांकडून चूक झाल्यामुळे विलंबाने शिष्यवृत्ती मिळाल्यास / न मिळाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संबधित विद्यार्थ्यांची राहील.

**तरी, दिव्यांग विद्यार्थ्यांनी ऑनलाईन भरलेल्या फॉर्मची प्रिंट व आवश्यक कागदपत्रे दि. ३१/१०/२०२२ पर्यंत 'प्रशासन भवन' येथे जमा करावेत याची विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी.**

TULJARAM CHATURCHAND COLLEGE BARAMATI

प्राचार्य

D:\users\amsolankar\Scholarship 2022-2023\Scholarship Notice 2021-22\Handicapped Scholarship 2020-21.docx